मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले






● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४१ ■ गुरुवार, १४ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**मुंबई :**नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.




यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

**नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी**


नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या.

सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. 18 ते 24 वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

- हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.
- भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.
- त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.
- काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.





**भवर परिवार व नांदे परिवार यांच्या विवाह सोहळा प्रसंगी उपस्थित राहून वधू वर पिता व वधू वरांना शुभेच्छा देताना. पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम पठाण, नगर पंचायत माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, युवराज जाधव, रानेश गिते पाटील यांच्या सह पाटोदा येथील मित्र परिवार...**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# शेलघरची किमया भगत दहावीत चमकली!

## महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर** : दिवंगत ज. आ. भगत आणि आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या शेलघर गावची कन्या किमया प्रशांत भगत दहावीत चमकली आहे. तिने गव्हाण-कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालयात इंग्रजी माध्यमात दहावीत ८९.४० टक्के गुण मिळवत घवघवीत यश मिळविले आहे. त्याबद्दल तिचे आणि वडील प्रशांत भगत यांचे कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पुस्तक भेट देऊन अभिनंदन केले




आणि तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "माझ्या गावची मुले आता विविध क्षेत्रांत चमकत आहेत. शेलघरचा सुनियोजित विकास करण्यात मी अथक परिश्रम केले. आता गावातील मुलांची यशस्वी कामगिरी बघून मनाला समाधान वाटते."







# जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे चा दहावीचा निकाल सलग १०० टक्के!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : 'विद्वान सर्वत्र पूजते' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवत आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलने आपला यशाचा आलेख यावर्षीही उंचावत ठेवला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत परीक्षेत विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यालयाने स्थापनेपासूनची 'शतप्रतिशत' निकालाची परंपरा यंदाही मोठ्या अभिमानाने कायम राखली आहे.


गुणवंत विद्यार्थ्यांची चमक:


यावर्षीच्या निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारली असून, दोन विद्यार्थिनींनी समान ८२.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाचा बहुमान विभागून मिळवला आहे.

प्रथम क्रमांक (संयुक्त): कु. दिशा उदय म्हात्रे (८२.२०%) आणि कु. श्रुती ऋषिकेश म्हात्रे (८२.२०%) द्वितीय क्रमांक: कु. कार्तिकी भारत पाटील (८०.४०% तृतीय क्रमांक: कु. भक्ती अयोध्या म्हात्रे (७८%) हे विद्यालय म्हणजे स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांच्या शैक्षणिक स्वप्नातून उभे राहिलेले एक मंदिर आहे. आज सर आपल्यात नसले तरी, त्यांच्या विचारांचा वारसा या यशाच्या रूपाने जिवंत असल्याचे पाहायला मिळाले. परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व २३ विद्यार्थ्यांनी आपले हे घवघवीत यश साश्रू नयनांनी आणि अत्यंत कृतज्ञतापूर्वक आपले लाडके स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांच्या पवित्र स्मृतीस अर्पण केले


कुमारी म्हात्रे दिक्षा उदय (82.20%)


कुमारी म्हात्रे श्रुती ऋषिकेश (82.20%)


कुमारी पाटील कार्तिकी भारत (80.40%)


कुमारी म्हात्रे भक्ती आयोध्या (78.00%)

आहे. "सरांनी पाहिलेले स्वप्न आम्ही आमच्या कष्टाने पूर्ण केले," अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आत्माराम ठाकूर मिशन संस्थेचे अध्यक्ष प्रतीक ठाकूर सर, खजिनदार वामन ठाकूर सर, विश्वस्त अलका ठाकूर मॅडम, सिंधू ठाकूर मॅडम, आदिनाथ ठाकूर सर ,प्रसाद ठाकूर सर, रीना ठाकूर मॅडम, मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे मॅडम व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# द्राक्षबाग तोडून रस्ता खुला; निफाडमध्ये प्रशासनाचा बुलडोझर पॅटर्न

## वीस वर्षांपासून बंद असलेले चार शिवरस्ते अखेर खुले

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यात अनेक वर्षांपासून अतिक्रमण आणि वादाच्या भोवऱ्यात अडकलेले चार शिवरस्ते अखेर महसूल प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे खुले करण्यात आले. मंगळवार, दि. १२ मे २०२६ रोजी झालेल्या या मोहिमेत काही ठिकाणी अतिक्रमण हटवण्यासाठी थेट द्राक्षबाग तोडण्याची वेळ आली. प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात शांततेत ही कारवाई पूर्ण करत शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावला.



मा. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपविभागीय अधिकारी शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड यांच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली. महसूल सहाय्यक शरद घाडगे, मच्छिंद्र भारस्कर व इतर अधिकारी-कर्मचारी यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

पहिल्या टप्प्यात मौजे रुई ते खेडलेझुंगे बोरमाथा हा तब्बल वीस वर्षांपासून बंद असलेला सुमारे दोन किलोमीटरचा शिवरस्ता खुला करण्यात आला. मंडळ अधिकारी जयंत लिलके, भूमी अभिलेख विभाग, पोलीस प्रशासन, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींच्या उपस्थितीत रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले.

त्यानंतर दात्याने-जिव्हाळे शिवरस्ता मंडळ अधिकारी शशिकांत विधाते यांच्या नेतृत्वाखाली खुला करण्यात आला. महसूल, कृषी व पोलीस विभागासह स्थानिक शेतकरीही यावेळी उपस्थित होते. मौजे कुंदेवाडी-रौळस शिवरस्ता देखील मंडळ अधिकारी अश्विनी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मोकळा करण्यात आला.

दरम्यान, आहेरगाव-वडनेरभैरव ग्रामीण मार्गावरील कारवाई सर्वाधिक चर्चेची ठरली.

रस्त्यात अडथळा ठरणारी द्राक्षबाग प्रशासनाने हटवून मार्ग मोकळा केला. मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर केसरे, पोलीस विभाग, ग्रामपंचायत अधिकारी, तंटामुक्ती समिती सदस्य व स्थानिक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई शांततेत पूर्ण झाली.

याशिवाय धारणगाव खडक-धानोरे शिवरस्ता खुला करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मंडळ अधिकारी संतोष डुंबरे यांनी दिली.

अनेक वर्षांपासून रखडलेल्या शिवरस्त्यांच्या प्रश्नावर महसूल प्रशासनाने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि प्रशासनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# खिरदान कार्यक्रम उत्साहात सम्राट अशोका बुद्ध विहार भिम नगर मेंडका संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी: प्रकाश गवारे :** भारतीय बौद्ध महासभा मुदखेड शाखा तालुका अध्यक्ष बौद्धाचार्य आयु. एल. पी.(प्रशांत) निखाते यांचा बुद्ध धम्म सहलमध्ये सहभाग व खिरदान कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमात बुद्ध धम्म सहलीत सहभागी झाल्यामुळे उपस्थित भारतीय बौद्ध महासभा मुदखेड, भारतीय बौद्ध महासभा भोकर, वंचित बहुजन आघाडी पक्षाचे कार्यकर्ते, समता सैनिक दल बारड महीला व जवान समाजीक कार्यकर्ते बांधवांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वंदनीय भंते गगन बौध्दी यांच्या शुभहस्ते त्रिशरण पंचशील ग्रहण करून झाली. त्यानंतर बौद्धाचार्य आयु. बाबुराव सोनकांबळे सर यांनी संपूर्ण संस्कार विधी पार पाडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य आयु. गोविंद गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन बौद्धाचार्य आयु. नागोराव लोखंडे सावरगावकर यांनी केले.

यावेळी आयु. एल. पी.(प्रशांत) निखाते व सौ. वंदनाताई एल.(प्रशांत) निखाते यांच्या हस्ते उपस्थित बौद्धाचार्य, समता सैनिक दलातील महिला सैनिक व कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. विविध भागांतून आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते व उपासक-उपासिका यांचे स्वागत





करण्यात आले.

आपल्या मनोगतात आयु. एल. पी. निखाते यांनी गेल्या २५ ते २६ वर्षांपासून सुरू असलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख करत बुद्धभूमी दर्शनाची मनातील इच्छा व्यक्त केली. समाजकार्य, भीम जयंती, बुद्ध जयंती आणि गावातील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना बुद्धगया दर्शनाची संधी मिळत नव्हती; मात्र यावर्षी त्यांनी निर्धार करून बुद्ध धम्म सहलीत सहभाग घेतल्याचे सांगितले.

या प्रवासात त्यांनी महु येथील बाबासाहेबांची जन्मभूमी,दिली येथील संसद भवन, राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, आग्रा येथील जगप्रसिद्ध ताजमहाल, तसेच लखनौ येथील भव्य डॉ . बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल यांना भेट दिल्याचे सांगितले. तसेच सारनाथ येथे धम्मचक्र प्रवर्तन स्थळ, लिंबुनी येथे भगवान बुद्धांची जन्मभूमी आणि कुशीनगर येथील महापरिनिर्वाण स्थळाचे दर्शन घेतल्याचा अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. लुंबिनी येथे विविध देशांनी उभारलेल्या भव्य विहारांचे वर्णन करताना त्यांनी "ते दृश्य प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची अनुभूती सांगता येणार नाही," असे भावनिक उद्गार काढले.

वंदनीय भंते गगन बौध्दी यांनी आपल्या मार्गदर्शनात भगवान गौतम बुद्ध यांच्या ज्ञानप्राप्ती, धम्मचक्र प्रवर्तन आणि पंचवर्गीय भिक्खूंना दिलेल्या उपदेशाचे महत्त्व विशद केले. सारनाथ येथूनच धम्माच्या प्रवासाची सुरुवात झाली असून बुद्धांनी मानवजातीला दुःखमुक्तीचा मार्ग दिला, असे त्यांनी सांगितले. तसेच कुशीनगर हे भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाचे पवित्र स्थळ असल्याचे नमूद करत चारही बौद्ध तीर्थक्षेत्रांचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले.

कार्यक्रमाला विविध गावांतील उपासक-उपासिका, समता सैनिक दलाचे कार्यकर्ते, वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ते व महिला सैनिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबाग तालुक्यातील भिलजी गावच्या सुकन्येचा गौरव

## हभप अश्विनी भोईर यांना 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार '२०२६' प्रदान!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : पत्रकार मित्र संघ आणि मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्राची संस्कृती आणि प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या रत्नतुल्य व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ८ मे २०२६ रोजी पेण एज्युकेशन सोसायटी, पेण येथे पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यात, वारकरी संप्रदायातील हभप अश्विनी भोईर यांना सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.



अलिबाग तालुक्यातील भिलजी या छोट्याशा गावात जन्मलेल्या अश्विनी भोईर यांना बालपणापासूनच आई-वडिलांकडून भक्तीचे बाळकडू मिळाले आहे. त्यांचे वडील हभप कृष्णा झावरे यांनी पंचक्रोशीत वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली होती. विशेष म्हणजे, अश्विनीताईंच्या या आध्यात्मिक प्रवासात त्यांचे पती नितीन भोईर यांचेही मोठे योगदान आणि प्रोत्साहन आहे. नितीन भोईर हे स्वतः उत्तम पखवाज वादक असून वारकरी संप्रदायात त्यांचेही कार्य मोलाचे आहे. पती-पत्नीच्या या जोडीमुळेच घराण्यात भक्तीचा हा सुगंध दरवळत आहे.

हभप अश्विनी भोईर यांच्या ओठावर जणू सरस्वतीची वाणी वसलेली आहे. त्यांच्या रसाळ कीर्तनाचा लाभ केवळ महाराष्ट्रालाच नाही, तर झी टॉकीज (झी टीव्ही) वरील 'नाचू कीर्तनाचे रंगी' या लोकप्रिय कीर्तन मालिकेतून जगभरातील हजारो श्रोत्यांनी घेतला आहे. ग्रामीण भागातून येऊन आपल्या वाणीच्या जोरावर वारकरी संप्रदायाचा संदेश साता समुद्रा पार पोहोचवणाऱ्या कराडी समाजाच्या या सुकन्येचा सन्मान होणे ही संपूर्ण समाजासाठी भुषणावह गोष्ट आहे.

हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या नम्र भावना व्यक्त करताना अश्विनीताई म्हणाल्या, "हा सन्मान माझा नसून पांडुरंगाच्या चरणी सेवा करणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचा आहे वारकरी संप्रदाय ही एक जीवन पद्धती असून साहित्याचा डिजिटल प्रसार करणाऱ्या वर माझा भर आहे. हभपअश्विनी भोईर यांना अध्यात्मिक क्षेत्रात त्याचबरोबर हभप मारूती महाराज कोल्हटकर अध्यात्मिक क्षेत्रात एक नामवंत व्यक्तीमत्व यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण ७७गुणवंताना यावेळी सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी अरुण शिर्के, मंगेश नेने, राजू पिचीका, प्रीतम पाटील, हंसी राज कपूर बागडी, विशाल जाधव यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# देवरीत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा 'कलेचा संगम'

## रोबोटिक्स आणि ॲनिमेशनद्वारे साकारणार माहितीपट,सोबतच आदिवासी रूढी परंपरा जपल्या जाणार

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांच्या वतीने आयोजित विशेष उन्हाळी शिबिर (Summer Camp) सध्या उत्साहात सुरू आहे. २४ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या शिबिरात गोंदिया जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधील निवडक २२५ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. यात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानापासून ते पारंपारिक कलेपर्यंतचे विविध धडे दिले जात आहेत.या विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडवणारा 'कलेचा संगम' हा भव्य मेळावा लवकरच देवरीकरांना अनुभवता येणार आहे.

या शिबिरासाठी गोंदिया जिल्ह्यातील विविध शासकीय आश्रमशाळांमधून विद्यार्थ्यांची विषयनिहाय आवड लक्षात घेऊन निवड करण्यात आली होती. त्यानंतर पार पडलेल्या एका छोट्या चाचणीच्या आधारे अत्यंत गुणवंत अशा २२५ मुलांची अंतिम निवड करण्यात आली. या विशेष उन्हाळी शिबिरात आधुनिक तंत्रज्ञान आणि समृद्ध परंपरा यांचा



सुवर्णसंगम साधण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना कोडिंग, रोबोटिक्स आणि खगोलशास्त्राचे प्रगत शिक्षण दिले जात असून, सोबतच बांबू हस्तकला व गोंडी आर्ट यांसारख्या पारंपारिक कलांद्वारे आदिवासी संस्कृतीचा वारसा जपण्याचे धडे दिले जात आहेत. शारीरिक तंदुरुस्तीसाठी धनुर्विद्या व मल्लखांब यांसारख्या खेळांचे, तर सर्जनशीलतेसाठी कथा लेखन, नाटक आणि संगीताचे प्रशिक्षण दिले जात आहे. थोडक्यात, हे शिबिर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.यामधून विद्यार्थ्यांना भविष्यात शैक्षणिक व्यासपीठाशिवाय एक अर्थार्जनाचे साधन तयार होण्यास मदत मिळणार आहे.

या शिबिराचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे रोबोटिक्स आणि ॲनिमेशन. आश्रमशाळेतील विद्यार्थी प्रथमच या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार केलेला आपला स्वतःचा माहितीपट जगासमोर सादर करणार आहेत. याशिवाय महिनाभरात विद्यार्थ्यांनी अवगत केलेल्या बांबू आर्ट, रांगोळी, गोंडी व पोट्रेट पेंटिंग, मेहंदी आणि क्ले-आर्ट या कलाकृतींचे प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे.

तालुका क्रीडा संकुल, देवरी येथे लवकरच एका विशेष मेळाव्याचे आयोजन केले जाणार आहे. यात नाशिक ढोलचा गजर, संगीत, नृत्य आणि ड्रामा यांसोबतच आदिवासी चालीरीती व परंपरांचे दर्शन घडवणारा 'कलेचा संगम' देवरी नगरातील जनतेला बघता येईल. विद्यार्थ्यांच्या १ महिन्याच्या मेहनतीतून साकारलेला हा सांस्कृतिक सोहळा सर्वांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरेल.

केवळ शिबिरातील शिक्षणच नव्हे, तर बाह्य जगाचा अनुभव मिळावा यासाठी या आठवड्यात सर्व २२५ विद्यार्थ्यांसाठी विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. यात विद्यार्थी नागपूर मेट्रो सफर अनुभवतील, तसेच वनामती, रमण सायन्स सेंटर आणि आयआयएम (IIM) नागपूर यांसारख्या नामांकित संस्थांना भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेणार आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांच्या या अभिनव उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात मोठी भर पडली असून, त्यांच्यातील कलाकाराला आणि वैज्ञानिकाला एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

या शिबिराकरीता आश्रम शाळेतील कला शिक्षक,क्रीडा शिक्षक ,कलाप्रेमी, तज्ञ मार्गदर्शक आणि चंद्रपूर येथील बांबू संशोधन केंद्राचे विशेष सहकार्य लाभले आहे.या उपक्रमासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी येथील प्रकल्प कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, गृहपाल, शिक्षक आणि सर्व कर्मचारी वृंद विशेष परिश्रम घेत आहेत. उन्हाळी सुटीचा असा विधायक उपयोग केल्याबद्दल पालकांनी व शिक्षण प्रेमींनी या उपक्रमाचे मोठे कौतुक केले आहे.

# ऑनलाइन औषध विक्री विरोधात ऑल इंडिया केमिस्ट असोसिएशन कडून देशव्यापी बंद

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी - दिपक गायकवाड** : औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अन्वये ऑनलाइन औषध विक्री करण्यास कायद्यात तरतूद नसतानाही देशभरात ऑनलाईन औषधी विक्री सर्रासपणे अँप द्वारे सुरू असल्याचा दावा औषध विक्रेते करीत आहे.

यामुळे ऑनलाइन औषध विक्रीच्या माध्यमाने रुग्णांपर्यंत बोगस औषधी, गुंगी आणणारी झोपेच्या गोळ्या,इंजेक्शन, नशेसाठी वापरात येणारे नारकोटिक्स ड्रग्स, कोडिन सारखे औषधी पुरवले जाण्याची शक्यता बळावत आहे. त्यामुळे ऑनलाइन औषध विक्री जीएसआर ८१७ मागे घ्यावे ,कॉर्पोरेट द्वारे अव्यवसायिक सवलती(डिस्काउंट) बंद कराव्यात तसेच कोविड काळातील जीएसआर २२० नोटिफिकेशन रद्द करून बनावट औषधी पासून देश वाचवण्याचे आव्हान ऑल इंडिया केमिस्ट असोसिएशन १ दिवसीय लक्षणीक बंद पाळत आहेत.केंद्र सरकारने ऑनलाइन औषध विक्री बाबतचा जीएसआर नोटिफिकेशन काढला होता परंतु अद्याप पर्यंत त्याचे कायद्यात रूपांतर झालेले नसल्यानेच उच्च न्यायालयाने ऑनलाइन औषधी विक्रीस स्थगिती दिली असून त्याकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्यामुळे पारंपारिक औषधी विक्रेत्यांच्या व्यवसायावर गदा येत असून २० मे २०२६ रोजी देश व्यापी बंद पुकारण्यात आला आहे. करोना काळात औषधांच्या डिलिव्हरी साठी विशेष सवलत देण्यात आली होती मात्र आज पर्यंत हे नोटिफिकेशन रद्द करण्यात न आल्याने ऑनलाइन कंपन्या भांडवलाच्या जोरावर पारंपारिक औषध विक्रेत्यांवर




अव्यवसायिक स्पर्धा निर्माण करत आहेत. यामुळे पारंपारिक व ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे संघटने सांगितले.

केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी औषध विक्रेत्यांच्या मागण्यांबाबत लोक तांत्रिक, संविधानिक न्याय भूमिका आणि मौलिक अधिकाऱ्यांची रक्षा करणे आवश्यक असून कायदेशीर भूमिका न घेतल्यास आंदोलनाचा पुढील टप्पा ठरविला जाणार असल्याचे सांगितले.

नियंत्रित किरकोळ औषध विक्रेत्यांना १६ टक्के नफा, घाऊक औषध विक्रेत्यांना ८ टक्के नफा जीवनावश्यक औषधावर मिळतो. तर अनियंत्रित औषधांवर हे प्रमाण दहा ते वीस टक्के असते. मात्र कार्पोरेटस कंपन्या वीस ते पन्नास टक्के पर्यंत सूट देऊन छोटे पारंपारिक औषध व्यवसाय संपवण्याचे काम करीत असल्याचा आरोप एआयओ सीडी संघटना करीत आहे.

# पनवेलच्या वडाळे तलावाला अश्लीलतेचा विळखा

## प्रेमी युगुलांच्या उच्छादामुळे नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल शहराच्या शिरपेचातील मानाचा तुरा समजला जाणारा ऐतिहासिक 'वडाळे तलाव' सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून सौंदर्याने नटवलेल्या या तलावाच्या परिसरात सध्या प्रेमी युगुलांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, त्यांच्या अश्लील चाळ्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांना येथून चालणेही कठीण झाले आहे.

वडाळे तलाव हा पनवेल आणि परिसरातील नागरिकांसाठी मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे. सकाळ-संध्याकाळ आबालवृद्ध येथे विरंगुळा म्हणून आणि व्यायामासाठी येत असतात. लहान मुलांसाठी खेळणी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची उत्तम सोय असल्याने येथे नेहमीच गर्दी असते. मात्र, गेल्या काही काळापासून या सौंदर्याला अश्लीलतेचे गालबोट लागले आहे. तलावाच्या काठावर आणि बागेत प्रेमी युगुलांची मोठी गर्दी असते. मात्र, ही युगुलं सार्वजनिक ठिकाणाचे भान न राखता खुलेआम अश्लील चाळे करताना दिसतात. विशेष म्हणजे, परिसरात सुरक्षारक्षक तैनात असूनही त्यांच्यावर कोणाचाही धाक उरलेला नाही. सुरक्षारक्षक अनेकदा याकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांना हटकले तरी ही मुले जुमानत नसल्याचे चित्र आहे. येथून ये-जा करणाऱ्या महिला आणि कुटुंबासोबत येणाऱ्या नागरिकांना या दृश्यांमुळे मान खाली घालावी लागत आहे. "आम्ही मुलांना घेऊन या ठिकाणी फिरायला येतो, पण येथील वातावरण पाहून मुलांवर काय संस्कार होणार? असा प्रश्न पडतो," अशी संतप्त प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली. अनेकदा नागरिकांना येथून जाताना लज्जास्पद वाटते, ज्यामुळे येथील गर्दी आता ओसरू लागली आहे. शहराचे सौंदर्य वाढवणाऱ्या या प्रेक्षणीय स्थळाचे पावित्र्य राखण्यासाठी पोलिसांनी आणि महानगरपालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. केवळ सुरक्षारक्षक नेमून उपयोग नाही, तर अशा टवाळखोरांवर आणि अश्लील चाळे करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# मुरुडमध्ये नवीन पाणीपुरवठा योजनेच्या शुल्कावर प्रश्नचिन्ह

■ 2500 ते 3000 हजार रुपये घेत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे;
■ जुन्या नळधारकांनाही पुन्हा डिपॉझिटची मागणी असल्याची चर्चा



**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी :** मुरुड शहरामध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळ कनेक्शन देण्याची प्रक्रिया सुरू असून, यासाठी नागरिकांकडून 2500 ते 3000 हजार रुपये घेतले जात असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये विविध प्रश्न उपस्थित होत असून, शुल्क आकारणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याची मागणी पुढे येत आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी ग्रामपंचायतीकडे डिपॉझिट भरून नळ कनेक्शन घेतलेल्या काही जुन्या नळधारकांनाही नव्याने रक्कम भरावी लागत असल्याची माहिती नागरिकांकडून समोर येत आहे. त्यामुळे "आधीच डिपॉझिट भरलेले असताना पुन्हा डिपॉझिट किंवा शुल्क का आकारले जात आहे?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, संबंधितांकडून शुल्काची पावती दिली जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र या शुल्काचा अधिकृत दर, ग्रामपंचायतीचा ठराव, तसेच नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत लागू असलेले नियम आणि अटी याबाबत स्पष्ट माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

नागरिकांच्या मते, नवीन योजना स्वतंत्र तांत्रिक, प्रशासकीय किंवा पायाभूत सुविधांच्या निकषांनुसार राबविण्यात येत असल्यास त्याबाबत अधिकृत सूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच जुन्या व नवीन कनेक्शन धारकांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे स्वरूप, डिपॉझिटची अट आणि त्यामागील नियम स्पष्ट करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पाणीपुरवठा ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अत्यावश्यक सेवा असल्याने गैरसमज निर्माण होऊ नयेत, यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने अधिकृत स्पष्टीकरण देऊन संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिल्लोड-सोयगाव बसस्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी निधीची मागणी

## आ. अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्यावर मंत्र्यांचे 'प्रस्तावा'चे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम व आधुनिक करण्याच्या दृष्टीने सिल्लोड आणि सोयगाव येथील बसस्थानकांच्या अद्यावतीकरणासाठी भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार अब्दुल सत्तार यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा. ना. श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.मंगळवारी (दि. १२) मुंबई येथे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात



आमदार अब्दुल सत्तार यांनी भेट घेऊन मतदारसंघातील विविध परिवहन विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी सिल्लोड व सोयगाव येथील बसस्थानकांचे आधुनिकीकरण, नवीन बस उपलब्ध करून देणे आणि प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. याप्रसंगी आमदार विलासभापू पा. भुमरे, नगराध्यक्ष अब्दुल समीर तसेच परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मतदारसंघातील नागरिकांना सुरक्षित, सुसज्ज व आधुनिक प्रवास सुविधा मिळाव्यात यासाठी बसस्थानकांचा विकास करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार अब्दुल सत्तार यांनी नमूद केले. तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांना वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा मिळण्यासाठी नवीन बसची मागणीही त्यांनी केली.

यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सिल्लोड व सोयगाव बसस्थानकांच्या आधुनिकी करणासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले असून चालू वर्षातच निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली आहे.

# आ. जितेंद्र आव्हाड यांचे निकटवर्तीय गणेश मुंडे यांचा शिवसेना शिंदे गट पक्षात प्रवेश

## कल्याण लोकसभा खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत केला पक्षप्रवेश

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** आमदार जितेंद्र आव्हाड यांचे निकटवर्तीय मानले जाणारे गणेश मुंडे यांनी अखेर दि. १२ मे रोजी शिवसेना (शिंदे गट) पक्षात आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह पक्ष प्रवेश केला गणेश मुंडे आत्ताच झालेल्या ठाणे महानगर पालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी(शरद चंद्र पवार) या पक्षाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते पण ऐनवेळी पक्षांनी त्यांना तिकीट नाकारून दुसऱ्या उमेदवाराला तिकीट दिले त्यामुळे गणेश मुंडे नाराज होऊन त्यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) या पक्षाकडून आपल्या पत्नीसाठी तिकीट मिळवून निवडणूक लढवली होती याचा फटका शरद चंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीला बसून एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या प्रभाग





२९ मध्ये शरद चंद्र पवार गटाच्या तिन्ही उमेदवार पराभावाला सामोरे जावे लागले होते.

गणेश मुंडे यांनी आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्या निवासस्थानी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षात प्रवेश केला यावेळी डॉ. श्रीकांत शिंदे खासदार कल्याण लोकसभा, श्री. राजेश मोरे आमदार कल्याण ग्रामीण, श्री. बाबाजी पाटील नगरसेवक ठाणे महानगरपालिका, श्री. रमाकांत मढवी माजी उपमापोर ठाणे महानगरपालिका,श्री. निलेश पाटील, श्री.वैभव अलीमकर आणि हजारो शिवसैनिक उपस्थित होते गणेश मुंडे यांचा सर्व धर्मीयांशी चांगला संवाद आणि दांडगा असा जनसंपर्क प्रभाग क्रमांक २९ मध्ये असल्याने भविष्यात शिवसेना पक्ष वाढीसाठी चांगला फायदा शिवसेनेला या प्रभागात होणार आहे. गणेश मुंडे यांच्यासोबत मनसे शाखाध्यक्ष मनोज पावशे तसेच मोहम्मद अली पठाण यांनी सुद्धा शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे

# येवदा येथे 'नगदी ॲग्रो शॉप'चे थाटात उद्घाटन : शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** तालुक्यातील येवदा येथे 'प्रगतीचा संकल्प सोहळा' अंतर्गत 'नगदी ॲग्रो शॉप'चा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. श्री. गजाननभाऊ लवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख मार्गदर्शन प्रसिद्ध हवामान अभ्यासक श्री. पंजाबराव डख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना संबोधित करताना डख यांनी बदलत्या हवामानाचा शेतीवरील परिणाम, येणाऱ्या काळात कोणती पिके फायदेशीर ठरतील, ऋतूनुसार लागवडीचे नियोजन तसेच पिकांची काढणी व शास्त्रोक्त साठवणूक याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे




शेतकऱ्यांना आधुनिक व नियोजनबद्ध शेतीची नवी दिशा मिळाल्याची भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी आमदार गजाननभाऊ लवटे यांनीही शेतकऱ्यांशी संवाद साधला. "शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून राष्ट्राचा कणा आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पीक विमा, सिंचन सुविधा, बाजारपेठेची उपलब्धता, शेतकरी उत्पादक कंपन्या अशा अनेक योजना राबवत असून त्यातून उत्पन्न वाढ व जोखीम कमी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

"दर्यापूरचा आमदार म्हणून शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन," अशी ग्वाही देत त्यांनी 'नगदी ॲग्रो शॉप'च्या संचालकांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. "आपण फक्त दुकान चालवू नका, तर शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करा. दर्जेदार वस्तू, योग्य किंमत, तज्ज्ञांचा सल्ला आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सतत साथ द्या," असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी आमदार लवटे यांनी प्रगतीचा हा संकल्प यशस्वी होवो, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होवो, अमरावतीचा विकास वेगाने होवो आणि महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य म्हणून जगाला दिशा देईल, अशी आशा व्यक्त केली.

मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास अमरावती लोकसभा क्षेत्राचे खासदार श्री. बळवंतभाऊ वानखडे, मा. हर्षराजभाऊ देशमुख, मा. सत्यजित देशमुख, मा. प्रदीप भाऊ देशमुख, मा. दिनकरराव गायगोले, सभापती कृ.उ.बा.स. दर्यापूर मा. सुनील पाटील गावंडे, मा. संजयराव निचळ साहेब, सामाजिक कार्यकर्ते मा. नितेश दादा गावंडे, उपतालुकाप्रमुख शिवसेना मा. राजूभाऊ मानकर, पोलीस पाटील कुंभारगाव मा. रवींद्र पाटील राजगुरु तसेच शिवसेना-युवासेनेचे आजी-माजी पदाधिकारी व येवदा येथील शेकडो ग्रामस्थ आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'जय जवान, जय किसान! भारत माता की जय!' च्या घोषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हा परिषद शाळेतील श्लोक ठाकूर हा भारत टॅलेंट सर्च परीक्षेत रायगड मध्ये प्रथम

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर :** "परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वप्न पाहण्याची हिंमत आणि ती पूर्ण करण्याची जिद्द असेल, तर यश निश्चित मिळते," हे आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे उरण तालुक्यातील कु. श्लोक योगेश ठाकूर याने.

एडुमीट अकॅडमी, महाराष्ट्र आयोजित भारत टॅलेंट सर्च (BTS) परीक्षा – २०२६ मध्ये श्लोकने उल्लेखनीय यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रायगड जिल्हा परिषद शाळा, खोपटे येथील इयत्ता ७ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या श्लोकने १५० पैकी तब्बल १३८ गुण मिळवत ९२ टक्के गुणांची शानदार कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे त्याने रायगड



जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या शाळेचा, गावाचा आणि पालकांचा गौरव वाढविला आहे.

सामान्य कुटुंबातून पुढे येत मर्यादित साधनांमध्येही श्लोकने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळविले. मोबाईल, टीव्ही आणि इतर आकर्षणांपासून दूर राहून त्याने अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे आज तो अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

"मोठे यश मिळवण्यासाठी मोठ्या सुविधा नव्हे, तर मोठी स्वप्ने आणि त्यासाठी अथक परिश्रम आवश्यक असतात," असा संदेश श्लोकच्या यशातून समाजाला मिळत आहे. ग्रामीण भागातील आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीसमोर हार न मानता शिक्षणाच्या बळावर स्वतःचे भविष्य घडवावे, अशी प्रेरणा या यशातून मिळत आहे.

श्लोकच्या या यशाबद्दल शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही तो असेच यश संपादन करून आपल्या कुटुंबाचे व रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# द्रुतगती महामार्गावर अवजड वाहनांचा बेफाम कारभार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (आनंद पवार) :** द्रुतगती महामार्गावर अवजड वाहन चालकांकडून वाहतूक नियमांचे सातत्याने उल्लंघन होत असल्याने सामान्य वाहन चालकांचे जीव अक्षरशः टांगणीला लागले आहेत. महामार्गावर स्पष्ट सूचना फलक लावूनही अवजड वाहन चालकांकडून लेन शिस्त पाळली जात नसल्याचे गंभीर चित्र समोर येत असून यामुळे वाहतूक कोंडीसह भीषण अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याची संतप्त प्रतिक्रिया वाहन चालकांमधून व्यक्त होत आहे.

महामार्गावर हलकी व अवजड वाहनांसाठी स्वतंत्र लेन निश्चित करण्यात आलेल्या आहेत.मात्र अनेक अवजड वाहन चालक नियम धाब्यावर बसवत भरधाव वेगात कुठल्याही लेनमधून वाहन चालवत ओव्हरटेक करत असल्याने छोट्या वाहन चालकांना मोठा धोका निर्माण होत आहे.विशेषतः रात्रीच्या वेळी आणि गर्दीच्या काळात हे प्रकार अधिक वाढत असल्याने वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनेकदा अवजड कंटेनर,ट्रक आणि ट्रेलर चालक रस्ता मोकळा दिसताच अचानक लेन बदलून पुढे जात असल्याने मागील वाहन चालकांना ब्रेक मारण्याची वेळ येते.परिणामी किरकोळ ते गंभीर अपघातांचा धोका वाढत असून वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ आणि इंधनही वाया जात आहे.

विशेष म्हणजे महामार्गावर सीसीटीव्ही, सूचना फलक आणि वाहतूक नियंत्रण यंत्रणा अस्तित्वात असतानाही नियम तोडणाऱ्या अवजड वाहन चालकांवर कठोर कारवाई होत नसल्याचा आरोप सामान्य वाहन चालकांकडून करण्यात येत आहे.संबंधित प्रादेशिक परिवहन मंडळ आणि वाहतूक विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची भावना आता नागरिकांमध्ये तीव्र होत आहे.

"महामार्गावर नियम फक्त छोट्या वाहनांसाठीच आहेत का?" असा संतप्त सवाल वाहन चालक उपस्थित करत आहेत.

दररोज जीव मुठीत धरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना अखेर दिलासा कधी मिळणार आणि बेफाम अवजड वाहन चालकांवर कठोर कारवाई कधी होणार,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दिग्रस तालुक्यातील सीमावर्ती भागात माती तस्करीचा धुमाकूळ

■ महसूल प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** दिग्रस तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या गावांमध्ये सध्या अवैध माती तस्करीने उच्चांक गाठला आहे. रात्रंदिवस चालणाऱ्या या बेकायदेशीर उपशामुळे पर्यावरणाचे नुकसान तर होतच आहे, पण त्यासोबतच सर्वसामान्य गावकऱ्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे, हे सर्व प्रशासनाच्या नाकाखाली सुरू असतानाही अधिकारी मात्र 'झोपेचे सोंग' घेत असल्याचा संतापजनक आरोप गावकरी करत आहेत.

तालुक्यातील हद्दीवर असलेल्या गावांतून गेल्या काही दिवसांपासून मातीचा अवैध उपसा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नियमांची पायमल्ली करत ट्रॅक्टरद्वारे ही माती हद्दीबाहेर नेली जात आहे. कोणत्याही प्रकारचा महसूल न भरता, गौण खनिजाची ही सर्रास लूट सुरू आहे. यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.या अवैध वाहतुकीमुळे गावकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे ,भरधाव वेगाने धावणाऱ्या ट्रॅक्टरमुळे रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे, ज्यामुळे श्वसनाचे विकार जडण्याची भीती व्यक्त होत आहे .

अरुंद रस्त्यावरून ओव्हरलोड माती घेऊन जाणारे ट्रॅक्टर पादचारी आणि इतर वाहनधारकांसाठी कर्दनकाळ ठरत आहेत. क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीमुळे गावातील रस्ते उखडले जात असून, येण्या-जाण्याऱ्या लोकांना याचा मोठा फटका बसत आहे.

# पनवेल शहर व २९ गावांच्या तीव्र पाणीटंचाई विरोधात १७ मे रोजी कामोठे येथील पाणी वितरण केंद्रावर जनमोर्चाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : महानगरपालिका क्षेत्रातील २९ गावे तसेच शहर परिसरात सध्या भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांमध्ये अपुरा व अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरीक विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. टँकरद्वारे देखील अपुरा पाणीपुरवठा होत आहे. या विरोधात 17 मे रोजी कामोठे येथील पाणी वितरण केंद्रावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पनवेल परिसर झपाट्याने विकसित होत असताना पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यात आलेले नाही. नागरिकांना मूलभूत गरज असलेले पाणी मिळत नसताना मात्र प्रशासन केवळ आश्वासन देत आहेत. रायगड जिल्ह्यातील खालापुर तालुक्यातील मोर्बे या ठिकाणी शासनाने धरण बांधले आहे. त्याची वितरण व्यवस्था पनवेल तालुक्यातून जात असून त्याचे वितरण केंद्र पनवेल तालुक्यातील कामोठे या भागात आहे. आज सुध्दा या धरणात ८५ दिवस पुरेल इतका पाणी साठा उपलब्ध आहे. आता पाऊस सुरु होण्यास फक्त ३० दिवसांचा अवधी आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतील अतिरिक्त १०० एमएलडी पाण्यापैकी किमान ३० एमएलडी पाणी पनवेल महानगरपालिकेस देण्यात यावे अशी रास्त मागणी वारंवार करणेत आली आहे. याबाबत मुख्यमंत्री,



उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, आयुक्त पनवेल महानगरपालिका, विभागीय आयुक्त कोकण विभाग, जिल्हाअधिकारी अलिबाग, खासदार श्रीरंग बारणे, महापौर पनवेल महानगरपालिका यांना निवेदन देण्यात आले असून १७ मे २०२६ रोजी आयोजित जनमोर्चाबाबत देखील पूर्वकल्पना दिली आहे. मात्र अध्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.

प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून पाणीप्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. त्यामुळे नागरिकांच्या न्याय हक्कासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १७ मे रोजी कामोठे येथून नवी मुंबई महानगरपालिकेस पाणी पुरवठा केला जातो त्या पाणी वितरण केंद्रावर भव्य जनमोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे. हा मोर्चा विरोधी पक्षनेता अरविंद म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली तसेच विविध नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक व हजारो पाणीग्रस्त नागरीकांच्या सहभागातून काढण्यात येणार आहे.

लोकशाही मार्गाने व शांततामय पध्दतीने हा जनमोर्चा काढण्यात येणार असून प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा जनआंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

**जनमोर्चाच्या प्रमुख मागण्या**

१. पनवेल महानगरपालिका क्षेत्रास तातडीने ३० एमएलडी अतिरिक्त पाणी मंजूर करावे.

२. २९ गावांसाठी स्वतंत्र व कायमस्वरूपी जलयोजना जाहीर करावी.

३. पाणी पुरवठ्यातील अनियमितता तातडीने थांबवावी.

४. मागणीप्रमाणे टँकर पाणी पुरवठा तात्काळ अग्रक्रमाणे करणेत यावा व पुढील कालावधीत टँकर अबलंबित्व कमी करून नियमित पाणी पुरवठा होणेसाठी नियोजन करावे.

५. सिडको, पनवेल महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका अन्य संबधित यंत्रणा यांची सुयुक्त बैठक तातडीने आयोजित करावी.

---

## ईव्हीएममुळे लोकशाहीवर प्रश्नचिन्ह; बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या — रोशन भाऊ जांभुळकर

**दैनिक युवक आधार**

**के रोशनलाल भंडारा :** ओबीसी समाजासह एससी, एसटी आणि मायनॉरिटीज समाजाच्या विविध समस्या कायम राहण्यामागे ईव्हीएम प्रणाली हे मुख्य कारण असल्याचा आरोप संविधान बचाव संघर्ष समितीचे जिल्हाध्यरोशनक्ष रोशन भाऊ जांभुळकर यांनी केला. ते १२ मे २०२६ रोजी आयोजित ओबीसी साखळी उपोषण आंदोलनात बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी समाजकल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांनी भूषविले.

यावेळी बोलताना रोशन भाऊ जांभुळकर म्हणाले की, “आज ओबीसी समाजाला आपल्या हक्कांसाठी सतत संघर्ष करावा लागत आहे. साखळी उपोषण, धरणे आंदोलने आणि मोर्चे काढण्याची वेळ येत आहे. यामागचे प्रमुख कारण म्हणजे




देशातील निवडणूक प्रक्रियेवर निर्माण झालेला अविश्वास आहे. आम्ही मतदान करतो, मात्र ते मतदान आमच्या पसंतीच्या उमेदवारालाच मिळाले की नाही, याबाबत जनतेमध्ये शंका निर्माण झाली आहे.”

ते पुढे म्हणाले की, “ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून निवडणुका घेतल्या जात असल्याने लोकशाही धोक्यात आली आहे. ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेतल्यास सामान्य जनतेचे खरे प्रतिनिधी निवडून येतील आणि समाजाच्या समस्या सुटण्यास मदत होईल.”

सभेचे संचालन ज्ञानचंद जांभुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सेवानिवृत्त तहसीलदार राजेश मडामे यांनी मानले. कार्यक्रमाला सदानंद इलमे, अमृत बनसोड, अरुण लूटे, श्रीकृष्ण पडोळे, राजेश टेंभुर्णे, आखरे सर, गोपाल देशमुख, ललिता ताई देशमुख, मनीषा भांडारकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, ओबीसी साखळी उपोषण आंदोलनाचा हा दुसरा दिवस असून आंदोलनाला विविध स्तरातून प्रतिसाद मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## पनवेल मनसेच्या शिष्टमंडळाने घेतली चार विषयांवर महापौरांची भेट

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन शहर आणि परिसराशी संबंधित चार महत्त्वाच्या विषयांवर निवेदन सादर केले.

शिष्टमंडळाने सर्वप्रथम खारघर परिसरात मराठी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी केली. या स्मारकामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळेल आणि मराठी अस्मितेचा गौरव अधिक दृढ होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दुसऱ्या मागणीत पनवेलमध्ये शतकानुशतके पारंपरिक व्यवसायासाठी येणाऱ्या आदिवासी बांधवांना त्यांच्या



हक्काची कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. यामुळे त्यांच्या उपजीविकेला स्थैर्य मिळेल आणि पारंपरिक उत्पादने नागरिकांना सहज उपलब्ध होतील.तिसऱ्या मुद्द्यात महाराष्ट्राच्या विविध भागांतून पनवेलमध्ये शेतीमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आठवड्यातून एक दिवस शहरात आरक्षित जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल आणि नागरिकांनाही ताजा व दर्जेदार शेतीमाल मिळेल. चौथ्या विषयात महिला आणि मुलींच्या विनयभंगाच्या वाढत्या घटनांचा विचार करून पनवेलमधील सर्व सरकारी व खासगी शाळांमध्ये “गुड टच, बॅड टच” आणि स्वसंरक्षण विषयक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याची मागणी करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढून मुलींच्या सुरक्षेला बळ मिळेल, असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला. महापौर नितीन पाटील यांनी शिष्टमंडळाच्या मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित विषयांवर आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या चारही मागण्यांमुळे पनवेल शहरातील सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांना चालना मिळणार असल्याची भावना मनसे कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

---

## बालयोगिणी मुक्तीनाथ यांची पंचधुनी तपस्या मौन अनुष्ठान व संत मुक्ताबाई समाधी सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर/ रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : श्रीनाथ मढी मुक्तीनाथ तपोवन संस्थान, टाळराळा ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे भारतीय संस्कृती व साधू संताची परंपरा जतन करत नाथ संप्रदयातील बालयोगिणी मुक्तीनाथ गुरु श्री महेश्वरीनाथ यांच्या सत्य संकल्पनेतून पंचधुनी तपस्या व मौन अनुष्ठान दिनांक २/५/२०२६ ते दि १२/५/२०२६ पर्यत ११ दिवसीय पंचधुनी तपस्या व मौन अनुष्ठान दि १२/५/२०२६ रोजी आदिशक्ती संत मुक्ताबाई समाधी सोहळाच्या काल्याच्या किर्तनाने संपन्न झाले. आदल्या दिवशी ह.भ.प. भागवताचार्य कु.ज्ञानेश्वरी



दिदी अनुपवाडीकर यांचे किर्तन सेवा झाली. समाधी सोहळाचे काल्याचे किर्तन ह.भ.प.बालयोगी गजेंद्र चैतन्यजी महाराज, माधापुरी यांचे झाले या वेळी विशेष उपस्थिती योगिणी महेश्वरीनाथ गुरु भजननाथ आदेश आश्रम सुखपुर ता.बाबरा जि.अमरेली गुजरात , मौनी बाबा उदगिर , हिंगोलीचे खासदार श्री नागेश पाटील आष्टीकर साहेब , माजी आमदार श्री माधवराव पाटील जवळगांवकर ,गोविदराव पा.नागेलीकर पंचक्रोशीतील सर्व भगतगण महाराष्ट्र, तेलंगना, आंध्रप्रदेश , कर्नाटक राज्यातील अनेक भक्तगण या वेळी उपस्थित होते..

## जळते जंगल रान जीवांची तळमळ

**रान पेटलं पेटलं**
**दिसे तांबडा डोंगर**
**जाती आभाळी पाखरं**
**बिळा मधून निघती**
**नाग परड मण्यार**
**त्याला कवेमधी घेई**
**धोंडा दगड पाचर**

आदिवासी कवी काळूदास कनोजे यांच्या कवितेतील ओळी जंगली वनव्याचे दुष्परिणाम अधोरेखित करतात.माणसाच्या पायाला ठेच लागली की औषध गोळी खातो चुलीवर स्वयंपाक करताना आगीचे चटके किती वेदनादायी आहे याचे भान येते. तसा वनव्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि दुष्परिणाम याचा विचार व अभ्यास न करता बुद्धीजीवी मानसाचे भान हरपून गेले आहे.

आदिवासी डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात, कडेकपारीत उन्हाळ्यात उष्ण वातावरणात वेळोवेळी वनवे लागल्याने जंगल क्षेत्र कमी होत चालले आहे. दिवसेंदिवस पर्जन्यवृष्टीत घट होत आहे. जंगलातील आगीमुळे हजारो वर्षांपासून टिकून राहिलेल्या मौल्यवान वनसंपदांचे नुकसान होते. रानातील गवताळ परिसंस्थेत बद्दल होत आहे. वनव्यामुळे जमीन भाजली जाते.जमीनीत



वास्तव्यास असणारे जीव सरपटणारे प्राणी स्वत:चा जीव धोक्यात घालून बिळात राहून नष्ट होतात तर काही वेळा बाहेर पडले तर शेतकऱ्यांच्या शेती कसणाऱ्या जमिनीत,दगडी बांधात आढळतात. गावाच्या वेशीलगत येतात घरात घुसतात, अनेक दुर्मिळ प्राणी लहान पक्षी,कीटक आगीत भस्मसात होतात तर काही वेळा पशू , पक्षी दुसऱ्या जंगलात निघून जातात. माणसाचा जितका जास्त हक्क जंगलावर आहे तशीच मक्तेदारी जमीनीत व जंगलात राहणाऱ्या वन्यजीवांची देखील आहे. दरवर्षी जंगलाला आग लागली की शेकडो वनसंपत्तीचे नुकसान होते. जुनी झाडे, बांबू, औषधी वनस्पती,रान फळं झाडे,जमीनीवर पडलेले बी जळून नष्ट होते.त्यामुळे नविन रोप उगवत नाही डोंगराळ भागात वृक्षारोपण होत नाही त्यामुळे उष्णता वाढली आहे.

आता तर लोक आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी भविष्यात फायदा होणार म्हणून आंब्याच्या कलम लावून संगोपन करताना दिसतात पण जंगली साग, सादडा,पापडा,बिवला,कळंब,धामोड हे डेरेदार वृक्ष नष्ट झाले तर मोठा वटवृक्ष व्हायला ६० ते ७० वर्षे लागतात त्यांची जोपासना करण्यासाठी कोणी तयार होत नाही. उन्हाळ्यात फाट्यासाठी घरासाठी सागची मोठाली झाडं तोडली का त्याची खुट( शिल्लक राहिलेले खोड )वाळून जातात. त्याला लागलेली आग लवकर विझत नाही,सागच्या पानांना व इतर झाडांचा गळून पडलेला पालापाचोळा याला आग लागली की संपुर्ण डोंगर काही क्षणातच तांबडा दिसतो, आदिवासी भागातील लोकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे. बहुतेक लोक डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत खरीप हंगामात शेती मातीवर राबतात पावसाळ्यात शेतीसाठी रोप तयार करण्यासाठी राब,आदोर, डांब भाजतात पण रीसा ( पाला पाचोळा झाडणे) करत नसल्याने वनवे लागतात, त्यामुळे पक्ष्यांची घरट्यांचे अधिवास नष्ट होतात, जमीनीवरील वाळलेली गवताळ कुरणे,सरवड जळल्याने माती उघडी पडते पावसाळ्यात पावसाच्या सरी कोसळल्याने मातीची धुप होते. त्यामुळे पाझर तलाव,धरणात ओहळातील चोंढीत,दहाडात गाळ साचतो त्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी होते.वनस्पती नष्ट झाल्यामुळे तृणभक्षी प्राण्यांची अन्न साखळी नाहीसी होते.पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी रानातील सर्व घटकांची गरज आहे.जंगलाला आग लावणे वनहक्क कायद्याने गुन्हा दाखल केला जातो जंगल क्षेत्र राखणे हे वनविभागाबरोबरच प्रत्येक बुद्धिजीवी मानसाचे काम आहे.

**संकलन :- सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक)**

---

## कान्होली पोस्ट ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यांची अनियमितता, नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** दर्यापूर तालुक्यातील कान्होली शाखा डाकघरात कर्मचारी वेळेवर हजर न राहिल्याने गेल्या दोन महिन्यांपासून नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. सकाळी 10 वाजता उघडणारे पोस्ट ऑफिस दुपारी 11 नंतर उघडत असल्याने शेतकरी, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत आहेत.




कान्होली शाखा डाकघराची वेळ सकाळी 10 ते दुपारी 12 अशी आहे. मात्र प्रत्यक्षात कार्यालय उघडण्यास रोज 1 ते तास उशीर होतो. अनेकदा दुपारी 12 वाजता कार्यालय बंदही केले जाते. त्यामुळे स्पीड पोस्ट, नोंदणीकृत पत्र, आधार अपडेट, पेन्शन वाटप, बचत खात्यातील व्यवहार यांसारखी कामे रखडली आहेत.गावातील एका ज्येष्ठ नागरिकाने सांगितले, "पेन्शन घेण्यासाठी तीन वेळा येऊन जावे लागले. उन्हातान्हात वाट पाहूनही कुलूपच दिसते." एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने सांगितले की, "स्कॉलरशिपचा फॉर्म स्पीड पोस्टाने पाठवायचा होता. वेळेत पोस्ट ऑफिस उघडलेच नाही, त्यामुळे मुदत चुकली."शेतकऱ्यांनाही फटका बसत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेक, पीक विम्याची कागदपत्रे, बियाणांचे पार्सल वेळेत मिळत नसल्याने आर्थिक नुकसान होत आहे. "गावातील कान्होली रामगाव कोळबी नरदोडा अनेक गावे या पोस्ट ऑफिसवर अवलंबून आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वाशिमच्या 'रमेश टॉकीज'मध्ये गुप्तधनाच्या शोधाचा थरार

## राजकीय दिग्गजांच्या निकटवर्तीयांसह ७ जण पोलिसांच्या ताब्यात!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या जुन्या आणि बंद पडलेल्या 'रमेश टॉकीज' परिसरात सुरू असलेल्या कथित गुप्तधन शोध मोहिमेचा अखेर मोठा भांडाफोड झाला असून या प्रकरणाला आता जबरदस्त राजकीय रंग चढला आहे. मंगळवारी (दि. १२ मे) सायंकाळी वाशिम शहर पोलिसांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने केलेल्या धाडीत ६ ते ७ संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या संशयितांमध्ये शहरातील काही नामांकित व्यक्ती, राजकीय दिग्गजांचे निकटवर्तीय आणि काही लोकप्रतिनिधींच्या स्वीय सहाय्यकांचा (PA) समावेश असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

या कारवाईमुळे वाशिम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळात अनेकांचे धाबे दणाणले आहेत. काही दिवसांपासून बंद पडलेल्या रमेश टॉकीजच्या इमारतीत गुप्तधन असल्याच्या अफवेवरून खोदकाम सुरू असल्याची चर्चा शहरात रंगत होती. या कामाला काही प्रभावशाली व्यक्तींचे संरक्षण असल्याच्या कुजबुजीमुळे या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास वाशिम शहर पोलिसांनी अचानक या ठिकाणी छापा टाकला. या वेळी घटनास्थळी सुरू असलेले खोदकाम, विविध



साहित्य आणि संशयास्पद हालचाली पाहून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत उपस्थितांना ताब्यात घेतले. ही संपूर्ण कारवाई इतक्या गोपनीय पद्धतीने करण्यात आली की संबंधितांना कोणतीही खबर लागू शकली नाही.

ताब्यात घेतलेल्या व्यक्तींमध्ये राजकीय संबंध असलेल्या काही व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून समोर येत आहे. काही बड्या नेत्यांच्या स्वीय सहाय्यकांची नावे चर्चेत आल्याने या प्रकरणाची गंभीरता अधिक वाढली आहे. अधिकृत पुष्टी झाल्यानंतर संबंधितांची नावे जाहीर होण्याची शक्यता असून, या खुलाशाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शहराच्या अत्यंत वर्दळीच्या भागात दिवसाढवळ्या सुरू असलेले हे खोदकाम इतक्या दिवसांपर्यंत कसे सुरू राहिले, याबाबत नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. एवढेच नव्हे तर हे केवळ गुप्तधनाच्या शोधासाठीचे खोदकाम होते की यामागे आणखी मोठे आर्थिक किंवा फसवणुकीचे रॅकेट कार्यरत आहे, याबाबतही विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत.

कारवाईनंतर पोलीस ठाण्यात अनेक प्रभावशाली व्यक्तींचे फोन आल्याची चर्चा शहरभर सुरू आहे. काहींनी ही कारवाई दाबण्याचा प्रयत्न केल्याचेही बोलले जात असले तरी, वाशिम शहर पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पुढील तपास सुरू ठेवला आहे. पोलिसांच्या या धाडसी आणि निष्पक्ष कारवाईचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

या घटनेमुळे शहरातील गुप्तधनाच्या अफवा, अंधश्रद्धा आणि त्यामागे कार्यरत असलेल्या आर्थिक व्यवहारांबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. बंद पडलेल्या रमेश टॉकीजसारख्या ऐतिहासिक वास्तूमध्ये अशा प्रकारे खोदकाम करण्यास परवानगी कोणी दिली, याचाही शोध घेतला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात आणखी काही प्रभावशाली नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ताब्यात घेतलेल्या संशयितांची चौकशी सुरू असून, मोबाईल कॉल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार आणि परस्पर संबंधांचीही तपासणी केली जात आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ गुप्तधन शोध मोहिमेपुरते मर्यादित न राहता मोठ्या स्वरूपाच्या उलगड्यात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संपूर्ण प्रकरणाचा तपास वाशिम शहर पोलीस करीत असून, लवकरच या कथित गुप्तधन प्रकरणातील 'व्हीआयपी' नावे आणि त्यामागील संपूर्ण जाळे उघड होण्याची शक्यता आहे. वाशिमकरांचे लक्ष आता पोलिसांच्या पुढील कारवाईकडे लागले आहे.

# खारपाडा टोलविरोधात मनसे मैदानात

## 15 मे पर्यंत मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दिपक कोळवणकर,प्रतिनिधी :** खारपाडा टोल नाक्यावर सुरू असलेल्या समस्यांबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्ण ताकदीने मैदानात उतरली असून प्रशासनाने तात्काळ ठोस निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा देण्यात आला आहे.

मनसे रायगड जिल्हा संघटक *. किरण गुरव* यांनी संबंधित टोल व्यवस्थापन व अधिकाऱ्यांना लेखी पत्र देत नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली आहे. टोल नाक्यावर होणारी वाहतूक कोंडी, अपुरी सुविधा, रस्त्यांची दुरवस्था आणि नागरिकांना होत असलेला त्रास या बाबी तातडीने सोडवाव्यात, अशी स्पष्ट भूमिका मनसेने घेतली आहे.या आंदोलनात




महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्ण ताकदीने सहभागी होणार असून, पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे. यामध्ये *रायगड जिल्हाध्यक्ष श्री. संदेश ठाकूर आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना* *जिल्हा अध्यक्ष (वाहतूक सेना) श्री. सचिन जाधव* यांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

तसेच *MH 46* *(रायगड जिल्हा)* आणि *MH 06 क्रमांकाच्या वाहनांना तसेच इलेक्ट्रिक* *वाहनांना टोलमाफी लागू* *करावी,* अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी ही सवलत आवश्यक असल्याचे मनसेने स्पष्ट केले आहे.

मनसेने इशारा दिला आहे की, *15 मे २०२६ पर्यंत मागणी मान्य न झाल्यास* *स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने व्यापक व तीव्र आंदोलन* *छेडण्यात येईल.* हा लढा लोकशाही मार्गाने आणि नागरिकांच्या हितासाठी सातत्याने सुरू राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# नग्न फोटो व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन 20 लाख उकळले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** खारघर येथे राहणाऱ्या महिलेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून नग्न फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली आणि 20 लाख रुपये उकळल्या प्रकरणी आरोपी रमेश ज्ञानदेव ढोपरे (वय 36, हमाली, रा. एपीएमसी मार्केट वाशी मुळगाव : बनपुरी, पाटण , सातारा) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 12 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील पीडित फिर्यादी खारघर येथे राहत आहेत. 2013 ते 2022 पर्यंत आरोपी रमेश ढोपरे याने फिर्यादी यांच्याशी ओळख केली आणि त्या मुलांसह एकट्या राहावयास आहेत याची माहिती घेऊन फिर्यादी यांनी त्यांच्या मुलाच्या गळ्याला कटर ब्लेड लावून त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले तसेच त्यांचे नग्न फोटो आणि व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली आणि त्यांच्याकडून रोख, बँक आणि ऑनलाइन स्वरूपात वीस लाख रुपये उकळले.

# 21 लाख 14 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** मेट्रोमोनी साईटवरून लग्न करण्यास पसंती दर्शवून वेगवेगळी कारणे सांगून महिलेकडून 21 लाख 14 हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 11 मे रोजी अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.20 सप्टेंबर 2025 ते 30 जानेवारी 2026 रोजी पीडित फिर्यादी यांनी मेट्रोमोनी साइटवर दिलेल्या प्रोफाइल वरून त्यांच्या मोबाईल क्रमांकावर समीर पांड्या (राहणार युनायटेड किंगडम) यांनी संपर्क साधला आणि तो डॉक्टर असल्याचे सांगून त्यांच्यासोबत लग्न करण्यास पसंती दर्शवली. त्यानंतर त्यांचे व्हाट्सअप वर बोलणे आणि चॅटिंग सुरू झाले. यावेळी आरोपी हा त्यांना मुंबईला भेटण्यासाठी येत असताना त्याला दिल्ली विमानतळ येथे इमिग्रेशन विभागातील अधिकारी यांनी जास्त प्रमाणात पैसे घेऊन आल्याच्या कारणावरून पकडले असून त्याला सोडवण्यासाठी इंटरनॅशनल टॅक्स सर्टिफिकेट तसेच अँटी मनी लॉन्ड्रींग सर्टिफिकेट साठी पैसे पाठवण्यास सांगितले. यावेळी व्हाट्सअप वर दिलेल्या वेगवेगळ्या खात्यावर फिर्यादी महिला यांनी 21 लाख 14 हजार रुपये पाठवले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# प्रहार संघटनेतर्फे जागतिक परिचारिका दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**के रोशलाल लाखनी :** जागतिक परिचारिका दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय पालांदुर चौ येथे प्रहार संघटनेच्या वतीने रुग्णांना फळवाटप करून हा दिवस सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साजरा करण्यात आला. आरोग्य सेवेत दिवस-रात्र कार्यरत राहून रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वितरण करण्यात आले तसेच परिचारिकांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करण्यात आले. "रुग्णसेवा हीच खरी मानवसेवा" हा संदेश देत प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न



केला.

या प्रसंगी जयेंद्र देशपांडे (रक्तवीर रुग्णमित्र तथा जिल्हा उपाध्यक्ष, प्रहार संघटना भंडारा), सुनील शेंडे, प्रकाश बांते महाराज, हेमराज गोटेफोडे, दामोधर सेलोटे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी परिचारिकांच्या कार्याला सलाम करत समाजानेही त्यांच्या योगदानाची दखल घेण्याची गरज व्यक्त केली.

# कोटनांद्रात जप्त वाळू साठ्याची 'चोरी'; प्रशासकीय भूमिकेवर संशय

## पुराव्यांसह तक्रार करूनही अधिकारी गप्प ; उच्च न्यायालयात धाव घेण्याचा सामाजिक कार्यकर्त्यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** सिल्लोड तालुक्यातील कोटनांद्रा येथील शासकीय ताब्यात असलेल्या जप्त वाळू साठ्यातून मोठ्या प्रमाणावर संघटित चोरी होत असल्याचा खळबळजनक आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली व माजी सरपंच संजय निकम यांनी केला आहे. या संदर्भात महसूल, गौण खनिकर्म व पोलीस प्रशासनाकडे डिजिटल पुरावे देऊनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने, या चोरीत संबंधित यंत्रणेचे संगनमत असल्याचा संशय तक्रारदारांनी व्यक्त केला आहे.



**नेमके प्रकरण काय?**

मौजे कोटनांद्रा येथील गट क्रमांक १४६ मध्ये महसूल विभागाने जप्त करून ठेवलेला हजारो ब्रास वाळूचा साठा आहे. प्राप्त तक्रारीनुसार, मागील काही दिवसांपासून या साठ्यातून दररोज १० ते १२ हायवा व टिप्परद्वारे अहोरात्र बेकायदेशीर वाळू वाहतूक केली जात आहे. तक्रारदारांनी संबंधित वाहनांचे क्रमांक, व्हिडिओ आणि स्क्रीनशॉट प्रशासनाला देऊनही अधिकारी प्रतिसाद देत नसल्याने शासनाच्या मालमत्तेची उघडपणे लूट होत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

यापूर्वी २०२३ मध्येही याच परिसरात नगरपरिषदेच्या कामाच्या नावाखाली ५ हजार ८३० ब्रासच्या परवानगीवर तब्बल ८० हजार ते १ लाख ब्रासपर्यंत अवैध उपसा झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. याचे आरटीआय आणि ईटीएस मोजणीचे दस्तऐवज उपलब्ध असूनही प्रभावी फौजदारी कारवाई झालेली नाही. जप्त वाळूच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्याने वाळू माफियांनी सरकारी मालमत्तेवर डल्ला मारला असून, तक्रारदारांवर जीवघेणे हल्ले होण्याच्या घटनाही घडल्या आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची पुराव्यासह तक्रार जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या प्रकरणाची 'एसआयटी' मार्फत चौकशी करावी, ड्रोन सर्वेक्षण करावे आणि दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास उच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद आणि लोकायुक्तांकडे धाव घेणार असल्याचे महेश शंकरपेल्ली यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# देवनीतील शासकीय माती वाहतूक प्रकरण गाजले

## दंड वसुलीची कारवाई सुरू; गुन्हा नोंदणी प्रक्रिया मात्र संशयाच्या भोवऱ्यात

**दैनिक युवक आधार**

**देवणी पांडुरंग कदम प्रतिनिधी :** देवणी तहसील कार्यालय परिसरातील गोदामाजवळील शासकीय जागेवरून विनापरवाना माती वाहतूक प्रकरण उघडकीस आल्यानंतर महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात विनानंबर पोकलेन जेसीबी व दोन हायवा टिप्परच्या माध्यमातून अंदाजे प्रत्येकी पाच ब्रास शासकीय मातीची अनधिकृत वाहतूक करण्यात आल्याचे महसूल पथकाच्या तपासणीत समोर आले आहे.

तपासणीदरम्यान वाहन चालकांकडे नमुना क्रमांक 28 मधील काही कोऱ्या पावत्या तसेच तहसीलदारांच्या नावाने आदेश क्रमांक 506, दि. 11 एप्रिल 2026 दाखविण्यात




आले. मात्र, संबंधित कागदपत्रांच्या सत्यतेबाबत संशय निर्माण झाला असून पंचनाम्यातील पावती क्रमांकांमध्येही विसंगती असल्याची चर्चा आहे.

या प्रकरणी दोन्ही टिप्पर मालकाने दंड भरले परंतु पोकलेन जेसीबी महसूल विभागाच्या ताब्यात होती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व गौण खनिज नियमांनुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून निलंगा विभागाचे उपविभागीय अधिकारी (डेप्युटी कलेक्टर) शरद झाडके यांनी ₹11 लाख 62 हजार 12 रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश दिले .

तहसील कार्यालयाकडून संबंधित दंड वसुलीसाठी तलाठ्याकडे पत्र देण्यात आल्याची माहिती समोर आली तसेच देवणी मंडळ विभागाकडून संबंधित पोकलेन मालकाविरुद्ध गुन्हा नोंदणीची कारवाईचे पत्र तहसीलदार त्यांच्याकडे सादर केले. तहसीलदार ने देवणी पोलीस ठाण्याकडे गुन्हा नोंद करण्याबाबत पत्र दिले नसल्याचे समोर आले, मात्र, प्रत्यक्षात या प्रक्रियेबाबत कोणतीही स्पष्ट हालचाल दिसून येत नसल्याने ही कारवाई गुलदस्त्यात जाणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तहसील कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, पोकलेनवर आकारण्यात आलेला सुमारे ₹7 लाख 50 हजारांचा दंड अद्याप भरला गेला नसल्याचे सांगण्यात येत आहे, तर उर्वरित दंडरक्कम टिप्पर मालकांकडून जमा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

यामुळे "पोकलेन चोरीला गेले होते की पळवून नेण्यात आले होते?" याबाबत तालुक्यात विविध चर्चा सुरू आहेत. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषींवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, तहसीलदार सोमनाथ वाडकर रुजू झाल्यापासून यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये सेवा देण्यात अकार्यक्षम असल्याबाबत नाराजी असून , या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बी.टी.एस भारत टॅलेंट सर्च परीक्षेत जि.प. हायस्कूल अर्धापूरच्या हिमांशू देशमुखचा केंद्रात तिसरा क्रमाक

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ :** भारत टॅलेंट सर्च (BTS) २०२६ परीक्षा मार्च महिन्यात घेण्यात आली होती. नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून अर्धापूर केंद्रातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेसाठी अर्धापूर येथील मीनाक्षी देशमुख गर्ल्स हायस्कूलची केंद्र म्हणून निवड करण्यात आली होती. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदविला होता. अर्धापूर केंद्रावर सुमारे चारशे ते साडेचारशे विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. परीक्षेचे उत्कृष्ट नियोजन बी.टी.एस.च्या संयोजक सौ. राऊत मॅडम यांनी त्यांच्या टीमसह केले होते.

या परीक्षेत जिल्हा परिषद हायस्कूल अर्धापूर येथील इयत्ता पहिलीचा विद्यार्थी हिमांशू रविंद्र देशमुख याने केंद्रात तिसरा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल सौ. पी. पी. भालेराव मॅडम, श्री. शेख सर, शालेय व्यवस्थापन समितीचे मंजूर अली,



शेख जाकीर सर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, व्यंकटी राऊत, प्रल्हादराव माटे, बबनराव लोखंडे, राजेंद्र साबळे, व्यंकटी माटे, प्रशांत खैरनार, प्रा. तानाजी मेटकर, मोहम्मद शकील, डॉ. संभाजी शेटे व अनिरुद्ध देशमुख यांनीही हिमांशूचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अभंग निरूपण

निरूपण : ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर


**अभंग :**

१. लोखंडाचा विळा परिसासी लाविला ।
मागीलिया मोला मागूं नये ॥१॥

२. दासी होती परि रायासी रतली ।
मागील ते बोली बोलें नये ॥२॥

३. वेश्या होती तेचि पतिव्रता जाली ।
मागील ते बोली बोलों नये ॥३॥

४. विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला ।
तो शिंपी वहिला म्हणों नये ॥४॥



संत नामदेव महाराज

**शब्दार्थ :**

- मोला – किंमत
- राया – राजा
- रतली – रममान, लग्न केले

**आशय :**

**१. लोखंडाचा विळा परिसासी लाविला । मागीलिया मोला मागूं नये...**
संत नामदेव महाराज या अभंगात जीवनातील फार मोठ रहस्य सांगतात. पहिला दृष्टांत लोखंड व सोन्याचा देतात. जेव्हा परिसाला स्पर्श करतं, तेव्हा ते सोनं बनतं... आणि एकदा सोनं झालं की, ते पुन्हा लोखंड होत नाही! याचा अर्थ काय? जेव्हा माणूस सत्संग, संकीर्तन, भगवंताच्या संगतीत येतो, तेव्हा त्याचं जीवन पूर्ण बदलतं...

**२. दासी होती परि रायासी रतली । मागील ते बोली बोलें नये...**
एक साधी दासी, जेव्हा राजाशी एकरूप होते, तेव्हा ती पुन्हा दासी म्हणून ओळखली जात नाही... म्हणजेच — भगवंताशी नातं जोडल्यावर, जुनी ओळख संपते!

**३. वेश्या होती तेचि पतिव्रता जाली । मागील ते बोली बोलों नये...**
" जी स्त्री समाजात तुच्छ मानली जात होती, तीच जेव्हा सत्वगुणी जीवन जगते, तेव्हा ती पवित्र बनते... इथे संदेश स्पष्ट आहे — भूतकाळ काहीही असो, परिवर्तन शक्य आहे!

**४. विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला । तो शिंपी वहिला म्हणों नये...**
जेव्हा विठ्ठलाच्या नामात संत नामदेव रंगून गेले, तेव्हा ते "शिंपी" राहिले नाहीत... ते झाले भगवंताचे दास, संत, आणि पूजनीय!

एकदा जीवनात परमेश्वराची अनुभूती आली, एकदा मन नामात रंगून गेलं, तर — जुनी ओळख, जुने दोष, जुने पाप... यांना काहीच अर्थ राहत नाही!

**॥ राम कृष्ण हरी ॥**

**शिकवण :**

**परिसाचा स्पर्श**
भूतकाळात अडकू नका. स्वतःला कमी समजू नका. कारण — "परिसाचा स्पर्श" कधीही होऊ शकतो, आणि तुमचं आमाचं जीवन सोन्यासारखं उजळू शकतं!

**परिवर्तन शक्य आहे**
भूतकाळ काहीही असो, सत्वगुणी जीवन जगल्याने प्रत्येक माणूस पवित्र होऊ शकतो.

**नामाची महती**
नामस्मरणाने मन शुद्ध होतं, जीवन बदलतं, आणि परमेश्वराची कृपा प्राप्त होते.

**देवाशी एकरूपता**
भगवंताशी नातं जोडल्यावर जुनी ओळख, जुने दोष, जुने पाप यांना काहीच अर्थ राहत नाही.

**नाम घ्या... जीवन बदला... आणि परमेश्वरात रंगून जा...**

# कोराडी येथे मध्य भारतातील सर्वात उंच हनुमान मूर्तीचे जूनमध्ये लोकार्पण- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

■ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत होणार भव्य सोहळा
■ अध्यात्मसमवेत जीवनमूल्य आणि कौशल्य विकासाचे कोराडी होईल महत्त्वाचे केंद्र

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : मध्य भारतातील आदिशक्ती स्थळ म्हणून गणल्या जाणाऱ्या कोराडीतील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसरात सर्वात उंच १६२ फूट हनुमान मूर्ती उभारणीचे काम पूर्णत्वास आले आहे. आध्यात्मिक केंद्रासह बचत गटांच्या महिलांना स्वयंरोजगाराची दिशा देणारे शक्तिस्थळ म्हणून या मंदिर संकुलाची गणना झाली असून यात भव्य हनुमान मूर्तीची अमूल्य भर पडली आहे. या भव्य हनुमान मूर्ती संकुल परिसराचे लोकार्पण जून महिन्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्याचे प्रयत्न केले जात असल्याची माहिती महसूलमंत्री तथा श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसरात युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण संकुल, महिला प्रशिक्षण केंद्र साकारून आध्यात्मिक केंद्रासह पर्यटन संकुलाच्या दृष्टीने रोजगार निर्मिती व्हावी यासाठी आमचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. यादृष्टीने नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती त्यांनी माध्यमांना दिली. या परिसरात हनुमानाची ही भव्य मूर्ती व परिसर येथील आध्यात्मिक केंद्रासह पर्यटनाला चालना देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

फाउंडेशनपासून २०६ फूट उंचीची ही मूर्ती असून प्रत्यक्ष मूर्तीचा आकार १६२ फूट आहे. ७४ फूट उंच गदा आहे. या ठिकाणी "सेव्हन-डी हनुमान चालीसा प्रोजेक्शन" करण्यात येणार असून भाविकांना हनुमानजींच्या माध्यमातून बलोपासना, उपासना, गुणग्राहकता एकाग्रता ही जीवनमूल्य अनुभवता येतील. मूर्तीखाली हनुमानजींच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. येथे उभारण्यात येत असलेल्या वीर हनुमानाच्या भव्य मूर्तीचा पाया महानिर्मितीद्वारे तयार करण्यात आला आहे.येथे आई जगदंबेचे पुरातन मंदिर, रामायण कल्चरल सेंटर, भारत माता मंडपम, विजनिर्मिती प्रेझेंटेशन, ॲडव्हेंचर पार्क, किड्स झोन, बोटिंग प्रकल्प समवेत अद्वितीय कौशल्य विद्यापीठ साकारण्यात येत असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

याठिकाणी ५०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ८०० विद्यार्थ्यांसाठी नाममात्र दरात शिक्षण, तीन लाख पुस्तकांची ई-लायब्ररी आणि आरोग्यसेवाही सुरू करण्यात येत आहे. या संपूर्ण तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी शासनाने २१४ कोटी ९४ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांनी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल श्री बावनकुळे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. परिसराच्या सुशोभीकरणासाठी मोठ्या प्रमाणात लँडस्केपिंग आणि 'बटरफ्लाय गार्डन' (फुलपाखरू उद्यान) विकसित केले जाणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अधीक्षक अभियंता प्रशांत भांडारकर, प्रकल्प सल्लागार अविनाश नवरकर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# स्वाभिमानी- प्रेरणादायी- महाप्रतापी : धर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला. संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे. या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते. याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली. औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळयात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला. औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता. कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.



परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली. यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला व पाठीत खंजीर खुपसला.यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये"१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही. त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले. अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला. परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत. पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली. परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली. औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज तब्बल ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती. शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी,आरोग्य,शिक्षण, मुलींवरील व महिलांवरील अत्याचार इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे. याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे. धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पित आहे व शोषण करीत आहे. याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण -बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**नागपूर.**

# पराक्रमी, बुद्धिमान छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांच्या त्यागाला, शौर्याला, विद्वत्तेला, कर्तृत्वाला, बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. संभाजीराजांच्या बलिदानाने गवताला भाले फुटले. हतबल झालेल्या मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. आपल्या देशाची अखंड प्रेरणा, अखंड स्फूर्ती म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. लेखणी आणि तलवार चालविणारा प्रतिभासंपन्न राजा म्हणजे संभाजी महाराज. आज (दि. 14 मे) त्यांची जयंती.

अवघे 32 वर्षांचे आयुष्य लाभलेल्या छत्रपती संभाजी महाराजांनी भारतीय इतिहासात जे शौर्य, धैर्य आणि औदार्य दाखविले त्याला तोड नाही. त्यांना प्रत्यक्ष पाहणारा फ्रेंच पर्यटक ॲबे कॅरे म्हणतो 'संभाजीसारखा पराक्रमी, बुद्धिमान आणि सुंदर राजपुत्र मी अन्यत्र पाहिला नाही.' संभाजीराजे शूर पराक्रमी तर होतेच; तितकेच ते महाबुद्धिमान होते. बालपणापासूनच ते अनेक विषयांत निष्णात होते. आजी जिजाऊ मासाहेब आणि वडील छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या संस्कृत शिक्षणाची व्यवस्था केली. ते संस्कृत भाषेचे महापंडित होते. त्यांनी बुधभूषण नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला. ते संस्कृत भाषेचे मोठे चिकित्सक होते. त्यांच्या पांडित्यावर आणि विद्वत्तेवर प्रभावित होऊन गागाभट्टांनी 'समयनय' हा ग्रंथ संभाजीराजांना अर्पण केलेला आहे. यावरून संभाजीराजांच्या विद्वत्तेची प्रचिती येते. केवळ संस्कृतच नव्हे, तर हिंदी भाषेवर देखील त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी हिंदी भाषेतून नखशिख, नायिकाभदे आणि सातसतक हे तीन हिंदी ग्रंथ लिहिले. त्यांची हिंदी अभिजात होती. मराठी भाषेबद्दल त्यांना स्वाभाविकपणे अभिमान होता. परंतु जगाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, परराष्ट्र व्यवहार यासाठी अनेक भाषा ज्ञात असणे अत्यावश्यक आहे ही त्यांची भूमिका होती. शिवरायांना संभाजीराजांबद्दल प्रचंड प्रेम आणि अभिमान होता. त्यांनी कधीही राज्याची अभिलाषा बाळगली नाही. संभाजीराजे शिवरायांना पन्हाळा येथे म्हणाले, "दूधभात खाऊन तुमच्या पायाची सेवा करेन, परंतु राज्याची वाटणी नको." संभाजीराजे विनयशील, प्रेमळ, स्वराज्यनिष्ठ होते, तितकेच ते शूर, पराक्रमी, कर्तव्यकठोर होते. निद्रेचे चार तास सोडले तर वीस तास अखंडपणे शेवटच्या क्षणापर्यंत ते लढत राहिले.

शिवरायांच्या काळात औरंगजेब स्वत: महाराष्ट्रात आला नव्हता. परंतु संभाजीराजांच्या काळात सुमारे सात लाखांची फौज घेऊन तो स्वराज्यात उतरला. शंभूराजांना पकडण्यासाठी आणि रयतेचे स्वराज्य चिरडण्यासाठी त्याने जंग जंग पछाडले. तो धूर्त, कावेबाज, पाताळयंत्री आणि निर्दयी होता. बापाला, भावाला, मुलांना, अनेक सुफी संतांना छळणारा औरंगजेब महाराष्ट्रात सुमारे 27 वर्षे ठाण मांडून होता. त्याला पूर्ण कल्पना होती की, मराठ्यांना चिरडल्याशिवाय संपूर्ण भारत एकछत्री अंमलाखाली येणार नाही. त्याला सर्व ताकदीनिशी प्रतिकार करण्याचे काम छत्रपती संभाजीराजांनी केले. एका वेळेस त्यांना मोगल, सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, मोगल आणि अंतर्गत शत्रू यांच्याविरुद्ध लढावे लागले. परंतु ते हतबल, निराश किंवा नाउमेद झाले नाहीत.



संकटाला ते निर्भीडपणे सामोरे गेले. संकटसमयी ते लढणारे होते, रडणारे नव्हते. मोगल, पोर्तुगाल, इंग्रज, सिद्धीच्या तुलनेत त्यांच्याकडे अपुरी साधने होती. परंतु दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वभाषा, स्वसंस्कृती, वतन आणि प्रजेवर अपार निष्ठा या बळावर ते लढत होते. औरंगजेबाचे महत्त्वाचे केंद्र असणाऱ्या बुऱ्हाणपुरावर त्यांनी हल्ला केला. जंजिरा जिंकण्याचा अंतिम टप्पा त्यांनी गाठला होता. गोवा जिंकण्यासाठी मांडवी नदी पार करण्याचा प्रयत्न केला. औरंगजेबाने पैसे पेरले, अनेक किल्ले जिंकले, त्याने जंग जंग पछाडले; परंतु मराठा मुलखातील शिवशंभूच्या मावळ्यांची मनं त्याला कधीही जिंकता आली नाहीत. संभाजीराजांनी त्याला हैराण केले. त्यामुळेच औरंगजेबाचा दरबारी इतिहासकार खाफी खान म्हणतो, 'संभाजी म्हणजे मोगलांसाठी वडिलांपेक्षा दहापटींनी तापदायक आहे.' इतका दरारा संभाजीराजांचा होता.

युद्धाच्या रणधुमाळीत प्रजेच्या कल्याणाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. त्यांनी अनेक न्यायनिवाडे केले. शेतकऱ्यांना भरघोस मदत केली. प्रजेच्या संरक्षणाला त्यांनी प्राधान्यक्रम दिला. महिलांच्या रक्षणासाठी आणि स्वातंत्र्यासाठी ते अत्यंत दक्ष होते. आपली महाराणी येसूबाईंना त्यांनी स्वराज्याचे कुलमुखत्यार केले. त्यांच्या नावाचा 'श्री सखी राज्ञी जयतू' असा शिक्का बनविला. आपल्या पत्नीला सर्वाधिकार देणारे संभाजीराजे स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. संभाजीराजे निर्व्यसनी, नीतिमान आणि समतावादी होते. त्यांना भेदभाव मान्य नव्हता. ते बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांनी आपल्या सहकारी, सैनिकांना, सरदारांना अत्यंत प्रेमाने वागविले. याचे वर्णन समकालीन ॲबे कॅरे करतो की, 'ते वयोवृद्ध आणि समवयस्क सैनिकांना अत्यंत मायेने आणि आदराने वागवतात. जखमी सैनिकांना स्वत: भेटून औषधोपचारांबाबत चौकशी करतात.' यावरून त्यांचा प्रेमळपणा आणि विनयशीलता स्पष्ट होते. त्यांनी ज्याप्रमाणे स्वराज्यरक्षण आणि स्वराज्यसंवर्धनाचे कार्य केले, त्याप्रमाणे त्यांनी धार्मिक परंपरा जतन करण्याचे देखील महान कार्य केले. मोगलांनी जेव्हा गंगाधर कुलकर्णी नामक व्यक्तीला सक्तीने मुसलमान केले होते, त्याला स्वधर्मात घेण्याचे काम संभाजीराजांनी केले.

शिवरायांनी शंभूराजाला बालपणापासून शौर्याचे, स्वाभिमानाचे, राजनीतीचे शिक्षण दिले. पुरंदर तहाच्या पूर्ततेसाठी आठव्या वर्षी संभाजीराजे मिर्झाराजे जयसिंगाच्या छावणीत गेले. वयाच्या आठव्या वर्षी स्वराज्य निर्मितीसाठी शत्रूच्या गोटात जाणारा पहिला बालवीर म्हणजे शंभूराजे आहेत. वयाच्या नवव्या वर्षी ते वडिलांसोबत आग्र्याला गेले. तेथे त्यांनी आपल्या वडिलांकडून स्वाभिमानाचे आणि साहसाचे शिक्षण घेतले. वयाच्या नवव्या वर्षी त्यांना वाराणसीत स्वराज्यापासून दूर राहावे लागले.

शिवरायांनी दक्षिण भारत जिंकला. उत्तर भारत जिंकण्याचे वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शंभूराजांनी नियोजन केले होते. दरम्यानल औरंगजेबाच्या सरदारांनी शंभूराजांना पकडले. त्यांची सुटका करण्यासाठी मोठा प्रयत्न झाला नाही, इतकी औरंगजेबाची दहशत होती. सरंजामदार, सनातनी आणि औरंगजेब यांनी संभाजीराजांना खूप छळले. सुमारे 39 दिवस औरंगजेबाने संभाजीराजांचा छळ केला. त्यांची विटंबना केली, त्यांना उंटावर बसवून विदुषकाचा पेहराव घालून अपमानित केले. डोळे काढले, जीभ कापली; परंतु संभाजीराजे औरंगजेबाला शरण गेले नाहीत. त्यांनी कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही.

आपल्या वडिलांनी, आजी-आजोबांनी निर्माण केलेले स्वराज्य, रक्षिलेली संस्कृती औरंगजेबाच्या चरणावर अर्पण केली नाही. त्यांचे प्रचंड हाल हाल केले. परंतु संभाजीराजे झुकले नाहीत, वाकले नाहीत. रडले नाहीत. मरण पत्करले; पण शरण गेले नाहीत. संभाजीराजांच्या त्यागाला, शौर्याला, विद्वत्तेला, कर्तृत्वाला, बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. अशा शंभूराजाची प्रेरणा घेऊन पुढे राजाराम महाराज, धनाजी-संताजी, महाराणी ताराबाई आणि लाखो जनता औरंगजेबाविरुद्ध लढत राहिली. शंभूराजांच्या बलिदानाने गवताला भाले फुटले. हतबल झालेल्या मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. आपल्या देशाची अखंड प्रेरणा, अखंड स्फूर्ती म्हणजे शंभूराजे. लेखणी आणि तलवार चालविणारा प्रतिभासंपन्न राजा म्हणजे संभाजीराजे आहेत.

**डॉ. श्रीमंत कोकाटे**

## भाजप आदिवासी आघाडीच्या पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी संतोष साठे तर चिटणीसपदी रविंद्र जोगवला यांची नियुक्ती !

**वाडा :** भाजप आदिवासी आघाडीच्या पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी संतोष साठे तर जिल्हा चिटणीसपदी रविंद्र जोगवला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्ष संघटनेची ध्येय धोरणं जनतेपर्यंत पोहचवून, संघटनेला बळकटी मिळावी यासाठी भारतीय जनता पार्टी आदिवासी आघाडीच्या पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी संतोष साठे तर जिल्हा चिटणीसपदी रविंद्र जोगवला या दोन्ही पदाधिकाऱ्यांची पक्षश्रेष्ठींनी निवड केली आहे. या झालेल्या निवडीमुळे खासदार डॉ.हेमंत सवरा व पक्ष संघटनेचे प्रदेश पदाधिकारी बाबाजी काठोळे व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन करुन पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तसेच आदिवासी समाजाच्या प्रश्नांना



न्याय मिळवून देण्यासाठी दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असल्याचे आमदार हरिश्चंद्र भोये व आदिवासी आघाडीच्या अध्यक्षा ज्योतीताई भोये यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून भारतीय जनता पार्टीची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## 'पल्स २०२७' साठी स्वतंत्र कंपनी व दुहेरी समित्यांची स्थापना, शासन निर्णय लवकरच – मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई :** वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात राज्याला जागतिक स्तरावर सक्षम करण्याच्या उद्देशाने आगामी 'पल्स 2027' परिषदेसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याबरोबरच दोन स्वतंत्र समित्या गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील चार ते पाच दिवसांत जारी करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत 'पल्स 2027'च्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले की, 'पल्स 2027'च्या प्रभावी अंमल बजावणीसाठी अधिकाऱ्यांची




एक समिती आणि शासन स्तरावरील दुसरी समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच पुढील पाच वर्षांसाठी कृती आराखडा तयार करून 'पल्स' उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.ही कंपनी स्थापन झाल्यानंतर सीएसआर निधी, आर्थिक व्यवहार, विविध गुंतवणूक प्रस्ताव तसेच सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा अधिक सुलभ होईल, असेही मंत्री मुश्रीफ यांनी नमूद केले.यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या 'पल्स 2026' परिषदेला देश-विदेशातील सुमारे 4 हजार 600 प्रतिनिधी उपस्थित राहिले. परिषदेदरम्यान 25 हून अधिक समांतर सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शासन, शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांच्या सहभागातून 'महाराष्ट्र डिक्लरेशन' स्वीकारण्यात आले असून पुढील पाच वर्षांसाठी 'महाराष्ट्र चार्टर'ही जाहीर करण्यात आले.'पल्स 2026'मध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत 15 सामंजस्य करार करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण, कौशल्य विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ, संशोधन आणि वैद्यकीय पर्यटन क्षेत्रातील या करारांमुळे लाइफ सायन्स व हेल्थटेक क्षेत्रात सुमारे 720 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला चालना मिळाल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.दरम्यान, 'पल्स 2027'साठी 10 हजार प्रतिनिधींच्या सहभागाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून 50 सामंजस्य करारांद्वारे सुमारे 2 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## हंताव्हायरसचा एका व्यक्तीकडून दुसऱ्याला संसर्ग होतो का? डॉक्टरांनी सांगितलं सत्य

हंताव्हायरस संसर्गामुळे जागतिक पातळीवर आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. हंताव्हायरस हा विषाणू अलीकडील श्वसनसंस्थेच्या साथीच्या रोगांसारखा पसरण्याची शक्यता असल्याबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. पण वैद्यकीय तज्ज्ञ या विषाणूचे वेगळे स्वरूप स्पष्ट करत आहेत. त्यांच्या मते,"त्याचा प्रसार कोविड-१९ च्या प्रसाराच्या पद्धतीसारखा नाही.

बंगळूरु येथील एस्टर आरव्ही हॉस्पिटलमधील इंटर्नल मेडिसिन विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. अरविंद एसएन यांनी एचटी लाइफस्टाइलला माहिती देताना हा विषाणू प्रत्यक्षात कसा कार्य करतो हे सांगितले आहे.

डॉ. अरविंदा यांच्या मते, लोकांमध्ये चिंतेचे मुख्य कारण म्हणजे विषाणू लोकसंख्येमध्ये कसा पसरतो याबद्दलचा गैरसमज आहे. "जगभरात हंताव्हायरस संसर्गामध्ये अलीकडे झालेल्या वाढीमुळे लोकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे, कारण लोकांना आता असे वाटते की, याचे एका नवीन जागतिक महामारीत रूपांतर होऊ शकते. हंताव्हायरसचा प्रसार हा कोविड-१९ सारख्या अत्यंत संसर्गजन्य श्वसन रोगांपेक्षा वेगळ्या यंत्रणेद्वारे होतो.



**हंताव्हायरसचा प्रसार नेमका कसा ?**

डॉ. अरविंदा यांनी स्पष्ट केले की, "हा विषाणू पूर्णपणे झुनोटिक(zoonotic) आहे, म्हणजेच तो प्राण्यांपासून – विशेषतः उंदरांपासून – माणसांमध्ये पसरतो. त्यांनी सांगितले, "संक्रमित उंदरांच्या थेट संपर्कातून माणसांना या विषाणूची लागण होते, कारण त्यांच्या मूत्र, लाळ आणि विष्ठेमध्ये हा विषाणू असतो.. हा धोका अनेकदा बंद आणि दुर्लक्षित जागांमधील हवेत असतो, ज्या जागांमध्ये योग्य मोकळ्या हवा नसते, त्या जागा स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेदरम्यान हवेत पसरणारे विषाणूयुक्त कण श्वासावाटे आत घेतल्याने लोकांना संसर्ग होतो."

विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पसरू शकतो का, या प्रश्नावर डॉ. अरविंदा म्हणाले, " एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होणारा प्रसार अत्यंत दुर्मिळ आहे. सध्याच्या संशोधनानुसार, उत्तर अमेरिका आणि इतर अनेक प्रदेशांमध्ये आढळलेले हंताव्हायरसचे बहुतेक स्ट्रेन व्यक्तींमध्ये पसरू शकत नाहीत."

**हंताव्हायरसचा प्रतिबंध आणि योग्य स्वच्छता**

डॉ. अरविंदा यांच्या मते, 'हवेतून पसरणाऱ्या श्वसनमार्गाच्या विषाणूंप्रमाणे मोठ्या लोकसंख्येमध्ये पसरण्याची क्षमता या विषाणूमध्ये नसल्यामुळे आरोग्यविषयक सल्ल्याचा मुख्य भर उंदीर नियंत्रण आणि विशिष्ट स्वच्छता नियमांवरच राहतो.

"संभाव्य संसर्गापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी लोकांनी उंदरांशी संपर्क टाळावा आणि योग्य स्वच्छता राखावी," असा सल्ला डॉ. अरविंदा यांनी दिला. त्यांनी जनतेला "उंदरांच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी आपल्या घरांमध्ये, कामाच्या ठिकाणी आणि अन्न साठवण्याच्या जागांमध्ये स्वच्छता राखण्याचे" आवाहन केले.

डॉ. अरविंदा यांनी अशा सामान्य स्वच्छता सवयींबद्दल सावध केले आहे, ज्यामुळे संसर्गाचा धोका प्रत्यक्षात वाढू शकतो. "उंदरांची विष्ठा साफ करण्यासाठी कोरड्या झाडून किंवा व्हॅक्यूम क्लिनरने साफसफाई करणे टाळावे, कारण या पद्धतींमुळे संसर्गजन्य घटक सभोवतालच्या हवेत पसरतात," असे त्यांनी स्पष्ट केले.

**त्याऐवजी, डॉ. अरविंदा यांच्या मते, खालील खबरदारी घेतली पाहिजे:**

**संरक्षक उपकरणे वापरा**

"दूषित ठिकाणी साफसफाईचे काम करताना लोकांनी हातमोजे, मास्क आणि जंतुनाशकांचा वापर करावा," असे ते म्हणाले.

**सामूहिक प्रादुर्भाव समजून घेणे**

जरी एकाच वेळी अनेक लोक आजारी पडू शकतात, तरी डॉ. अरविंदा यांनी स्पष्ट केले की, "क्रूझ जहाजे आणि सामायिक निवासस्थाने यांसारख्या सामूहिक ठिकाणी प्रादुर्भावाचे मुख्य कारण पर्यावरणीय संपर्क हे आहे, कारण लोक एकमेकांना थेट आजार पसरवत नाहीत."अशा परिस्थितीत, सामायिक आणि दूषित जागा हे सहसा एक समान कारण असते. "व्यवस्थितपणे देखभाल न केलेल्या केबिन, दूषित अन्न साठवणुकीच्या जागा आणि उंदरांचा सुळसुळाट असलेल्या जागांमुळे अनेक प्रकारचे संसर्ग होऊ शकतात," असा निष्कर्ष डॉ. अरविंदा यांनी काढला.

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती—हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ—चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी—लाकूड आणि गवताची—असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत



पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या–१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०–५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तींच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे—सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन "भक्ती आणि लज्जा" असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२–१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: "या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे."

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल. दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण—मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना "ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू" हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे—पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही;

तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो—

"आम्ही अजूनही येथे आहोत.

आम्ही स्मरण ठेवतो.

आम्ही पुन्हा उभारतो.

आम्ही टिकून राहतो."

**– ब्रिजेश सिंह,**
**प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी संयुक्त प्रवेश परीक्षा (नीट युजिसी ) रद्द करण्यात आल्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने ( एनटीए) मंगळवारी जाहीर केला. ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने घेतला आहे. तीन मे रोजी झालेल्या या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील तब्बल १२० प्रश्न हे परीक्षेच्या पंधरा दिवसांपूर्वी अंदाज म्हणून वर्तविण्यात आलेल्या प्रश्नसंचिकेतील असल्याचे निदर्शनास आल्या नंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने हा निर्णय घेतला. एकाच प्रश्नसंचिकेतील १२० प्रश्न जसेच्या तसे नीटच्या परीक्षेत येणे ही पेपर फुटीच आहे. नीट सारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर अशा पद्धतीने फुटणे ही जितकी धक्कादायक बाब आहे तितकीच ती चिंतनीयही आहे. ही परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे दहा लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्ष रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे. भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे. खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आता आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतीगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज जॉइन करणे यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहे. दोन वर्षांची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव आला आहे. वारंवार पेपर फुटीच्या घटना घडत असतील तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने परीक्षेची तयारी करावी ?

ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी केलेला खेळ आहे. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती निर्माण झाली आहे. यापुढे तरी पेपर फुटी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाची स्थापना करताना विद्यार्थ्यांची सोय, गुणवत्ता आणि पारदर्शीपणा हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षात तीन वेळा नीटचा पेपर फुटल्याचे समोर आले आहे. २०२४ सालीही नीट परीक्षेचा पेपर फुटला होता. तेंव्हा नीटचा पेपर वीस ते चाळीस लाखांना विकला गेल्याचे समोर आले होते त्यामुळे घोषित केलेला निकाल बदलण्याची नामुष्की राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणावर आली होती.

त्यानंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने नीटची परीक्षा सुरक्षित करण्यासाठीच्या उपाययोजना करणे आवश्यक होते.

मात्र तसे झालेले नाही हे यंदाच्या प्रकरणावरून दिसून येते. नीट परीक्षेत पेपर फुटू नये यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना गरजेच्या आहेत.

**श्याम ठाणेदार**

# हिमोफिलीया उपचारासाठी एका महिन्यात तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

## राज्यात ५ हजार ४९७ रुग्णांची नोंद ; प्रत्येक जिल्ह्यात डे–केअर सेंटर कार्यान्वित

**मुंबई :** हिमोफिलीया रुग्णांचे ऑनलाईन पोर्टलद्वारे ट्रॅकिंग करून त्यांना देण्यात येणाऱ्या उपचाराची अद्ययावत नोंद ठेवावी तसेच एका महिन्याच्या आत हिमोफिलीयासाठी राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. राज्यातील हिमोफिलीया रुग्णांवरील उपचारासंदर्भात आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी मंत्री आबिटकर यांनी गुजरात, जम्मू काश्मीर, केरळ, कर्नाटक यासह इतर राज्यात हिमोफिलीया संदर्भात राबविण्यात येत असलेल्या धोरणांचा अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) च्या पीआयपी वार्षिक कार्यक्रम कृती आराखड्यात हिमोफिलीया आजारासाठी



निधी मिळावा यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले.

राज्यात हिमोफिलीया रुग्णांना तातडीने आणि प्रभावी उपचार मिळावेत यासाठी प्रत्येक जिल्ह्यात डे-केअर सेंटर कार्यान्वित करण्यात आले असून, राज्यात एकूण ५ हजार ४९७ हिमोफिलीया रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. या आजाराचे कमी तीव्र, मध्यम तीव्र आणि तीव्र असे वर्गीकरण असून, मध्यम व तीव्र स्वरूपाच्या रुग्णांमध्ये अचानक रक्तस्राव होण्याचा धोका अधिक असतो. या रुग्णांना तातडीने निदान, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी प्रत्येक जिल्ह्यात सामाईक डे-केअर सेंटर अद्यावत करावीत. तसेच रुग्णांचा डाटा एकत्रित करून या आजाराला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बैठकीस खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार उमा गिरीश खापरे, आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, नागरी अभियान आयुक्त डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड तसेच हिमोफिलिया सोसायटी या संस्थेचे प्रतिनिधी व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.